प्रशासकीय मान्यता आदेश

जलजीवन मिशन सन २०२२-२३ अंतर्गत अहमदनगर जिल्हयातील नळ पाणीपुरवठा योजनांची अंदाजपत्रके व आराखडयास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

## जिल्हा परिषद अहमदनगर
## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

आदेश जा.क्र .ग्रापापु/कार्या/प्रशा-१-४/623-654/२०२२

दिनांक 23/9 /२०२२

वाचा :- १. शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु ०७ दि. १७ ऑक्टोबर २०१४

२. शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.८१/पापु-०७ दि. २७ मार्च २०१५.

३. शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७ दि. १५ जुन २०१५.

४. शासन निर्णय क्र जजमि-२०१९/प्र.क्र.१३८/पापु-१०(०७) दि.४ सप्टेंबर २०२०.

५. शासन निर्णय क्र जजमि/०६२०/प्र.क्र.२०/पापु-०७ दि.३० जुन २०२०.

६. शासन निर्णय क्र जजमि/०६०२०/प्र.क्र.२०/पापु-०७ दि.०३ ऑगस्ट २०२०.

७. शासन निर्णय क्र राग्रापे-२०१८/प्र.क्र.४०/पापु-१० दि.२ फेब्रुवारी २०२१.

८. शासन शुध्दीपत्रक क्र.जजीमि-२०१९/प्र.क्र.१३८/पापु-१० (०७) दिनांक ११ फेब्रुवारी २०२१

९. शासन निर्णय क्र जजमि-२०१९/प्र.क्र.१३८(भाग२)/पापु-१० दि.१० मार्च २०२१..

१०. मा. अभियान संचालक, रा.पा.व स्व.मि. सिडको भवन नवी मुंबई यांचेकडील पत्र क्र. जजीमि-२०२२/प्र.क्र.१४३अ/पापु-०१/८२८, दिनांक ०७.०६.२०२२.

११. मा.अध्यक्ष जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन तथा जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील मंजुर टिपणी दि. १५/०९/२०२२.

जलजीवन मिशन अंतर्गत सन २०२१-२२ कृती आराखडयातील, अहमदनगर जिल्हयातील नळ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी मिळालेली आहे. संदर्भ क्र. ८ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन यांना प्रदान करण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता देण्याच्या अधिकारानुसार, खालील अटी व शर्तींच्या पूर्तता करण्याच्या अधीन राहून खालील नळ पाणी पुरवठा योजनांना काम निहाय प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तालुका | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | दरडोई खर्च | तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक | वार्षिक कृती आराखडा सन २०२१-२२ नुसार (रेट्रोफिटींग/ नवीन) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीगोंदा | कोरेगव्हाण | ७८.१४ | ४९४९ | ८२१, दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| २ | श्रीगोंदा | दानेवाडी | १४७.१८ | ४८४८ | ८२२, दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| ३ | जामखेड | पोटेवाडी | ६४.७३ | ४७२२ | ८२३, दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| ४ | कर्जत | दुधोडी | ८३.६० | २४४८ | ८२४, दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| ५ | कर्जत | खेड | १५७.८१ | १५३६ | ८२५, दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| ६ | कर्जत | बारडगाव सुद्रीक | १९९.०० | २९१३ | ८२६, दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| ७ | श्रीरामपूर | ब्राम्हणगाव वेताळ | ९४.१४ | ३५७८ | ८२७, दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |

| अ. क्र. | तालुका | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | दरडोई खर्च | तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक | वार्षिक कृती आराखडा सन २०२१-२२ नुसार (रेट्रोफिटींग / नवीन) |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | कोपरगाव | बोलकी | ६५.९७ | २१८९ | ८२८ दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| ९ | पारनेर | अपधुप | १२२.६२ | ८७१० | ८२९ दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| १० | पारनेर | म्हसणे | १६७.३० | ८१९६ | ८३० दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| ११ | पारनेर | पठारवाडी | १९९.९८ | ४३८९ | ८३१ दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| १२ | पारनेर | गांजी भोयरे | १९९.८६ | ४६६८ | ८३२. दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| १३ | पारनेर | शहांजापूर | १५९.९९ | ९५१३ | ८३३. दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| १४ | पारनेर | नावलेवाडी | ११२.५४ | ६२४१ | ८३४ दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| १५ | शेवगाव | निंबे-नांदुर | १४७.०८ | २२७२ | ८३५. दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| १६ | पाथर्डी | कामत शिंगवे | १९५.७६ | ५९१९ | ८३६. दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| १७ | पाथर्डी | जवखेडे दुमाला | ८०.२७ | ५४४७ | ८३७ दि. २६.०८.२०२२ | रेट्रोफिटींग |
| १८ | श्रीगोंदा | ढवळगाव | १७१.४८ | २३६० | ८३८. दि. २६.०८.२०२२ | नवीन |
| १९ | पारनेर | राळेगाव थेरपाळ | १३२.१९ | २४०६ | ८३९. दि. २६.०८.२०२२ | नवीन |
| २० | पाथर्डी | ढवळेवाडी | ९४.१४ | २४९७ | ८४०. दि. २६.०८.२०२२ | नवीन |
| २१ | पाथर्डी | कोरडगाव | १८६.५० | ३००८ | ८४१. दि. २६.०८.२०२२ | नवीन |
| २२ | पाथर्डी | वडगाव | १७५.९३ | ४०९२ | ८४२. दि. २६.०८.२०२२ | नवीन |
| २३ | शेवगाव | पिंगेवाडी | १४८.०२ | २३५९ | ८४३. दि. २६.०८.२०२२ | नवीन |
| २४ | शेवगाव | शेकटे खु. | १०७.३० | ४०९१ | ८४४. दि. २६.०८.२०२२ | नवीन |
| २५ | शेवगाव | घेवरी-देवळाणी | ८९.५४ | ४३८६ | ८४५. दि. २६.०८.२०२२ | नवीन |
| | एकुण | | ३३८१.०७ | | | |

अटी व शर्ती :-

१. दि. १० मार्च २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीचा अवलंब करावा.
२. सदर योजनेची अमलबजावणी जिल्हा परिषद, अहमदनगर मार्फत करण्यात यावी. योजनेची अमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. योजना देखभाल दुरुस्तीसाठी दि १७ ऑक्टोंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.
३. सदर योजनेतुन प्रत्येक घरास नळ जोडणी देणे आवश्यक आहे. यादृष्टीने आतापर्यंत दिलेल्या नळ जोडणी व पुढे देण्याच्या नळ जोडणीबाबत IMIS वर माहिती नोंदविणे आवश्यक आहे. नवीन जोडणीबाबत आवश्यक ते नियोजन करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील.

४. संदर्भ क्र. ४ नुसार शासन निर्णयातील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्ती करिता योजनेच्या किंमतीच्या १० / ०५ टक्के रक्कम लोकवर्गणीच्या स्वरुपात ग्रामपंचायतीकडे ठेवणे आवश्यक राहील. सदर रक्कम जमा करुन घेण्याची जबाबदारी ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेची राहील.

५. योजनेसाठी आवश्यक भुसंपादन व इतर सर्व परवानग्या (पाणी आरक्षण, वने/रेल्वे/रस्ते/क्रॉसिंग इ.) प्राप्त झाल्याशिवाय योजनेच्या निविदा मागविण्यात येऊ नयेत. सदर अटीची पूर्तता न करताच निविदा मागविण्यात आल्यास या शासन निर्णयान्वये आलेली प्रशासकीय मान्यता रद्द समजण्यात येईल.

६. योजनेची कामे मंजूर किंमतीत कालबध्द व नियोजनबध्दरित्या पुर्ण करण्यात यावीत.

७. योजनेचा उद्भव विकसित झाल्याशिवाय इतर कामे सुरु नयेत. उद्भवामध्ये पुरेसे पाणी उपलब्ध असल्याची खात्री केल्यानंतरच योजनेतील इतर कामे करावीत.

८. योजना चालविणे व देखभाल दुरुस्ती यासाठी येणारा खर्च भागविण्याकरिता संबंधित ग्रामपंचायतीने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावामध्ये नमुद केल्यानुसार घरगुती, बिगर घरगुती व संस्थात्मक नळ धारकासाठी पाणी पट्टीचा दर निश्चित करावा व त्यात कालपरत्वे वाढ करण्यात यावी.

९. योजना चालविणे त्याचे परिरक्षण व देखभाल दुरुस्ती यासाठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीस/जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणतीही मदत/ अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१०. योजना पुर्णत्वानुसार १०० टक्के घरगुती नळ जोडणी करणे बंधनकारक राहील.

११. कोणत्याही कारणाने योजनेच्या खर्चात वाढ झाल्यास शासनाकडून जादा अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१२. मा. अभियान संचालक, रा.पा.व स्व.मि. सिडको भवन नवी मुंबई यांचेकडील पत्र क्र. जजीमि-२०२२/ प्र.क्र.१४३अ/पापु-०१/८२८, दिनांक ०७.०६.२०२२. तरतुदीनुसार योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे अनिवार्य राहील.

१३. योजना स्वयंनिर्भर होण्यासाठी आवश्यक पाणीपटटी निश्चित करणे व प्रत्यक्ष खर्चावर आधारित आवश्यकतेनुसार वाढ करणे ग्रामपंचायतीस बंधनकारक राहील.

१४. योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने योजना पुर्णत्वाचा दाखला सक्षम प्राधिका-याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१५. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये कोणत्याही स्वरुपाची अनियमितता, अपहार अथवा गैरव्यहाराच्या बाबी निदर्शनास आल्यास अनियमिततेस जबाबदार संबंधित प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार/अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र राहतील.

१६. जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनां करिता विहित केलेली मानके पुर्ण करणे बंधनकारक राहील.

१७. योजनेच्या प्रगतीप्रमाणे खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे व योजनेच्या पुर्णत्वाचे दाखले संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून प्राप्त करुन घेवून शासनास सादर करण्याची जबाबदारी जि.प.ग्रा.पा.पु.विभाग अहमदनगर यांची राहील.

१८. या योजनेवर होणारा खर्च मागणी क्र वाय-०२ २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, जल जीवन मिशन कार्यक्रम (राज्य/केंद्र हिस्सा) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२२१५ ९७९१) कार्यक्रम, जल जीवन मिशन कार्यक्रम (राज्य/केंद्र हिस्सा) (२२१५ २०७१) तसेच राज्य हिस्स्याकरिता ३१ सहायक जल जीवन मिशन कार्यक्रम (राज्य/केंद्र हिस्सा) (२२१५ २०७१) तसेच राज्य हिस्स्याकरिता ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) लेखाशिर्षाखाली ल तरतुदीमधून भागविण्यात यावा.

सह अध्यक्ष
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

कार्यकारी अभियंता
ग्रामिण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, अहमदनगर